# प्रकरण पाचवे

## उपसंहार

# प्रकरण पाचवे

## उपसंहार

मराठी वाङ्.मयाचा अभ्यास करताना या वाङ्.मयाचे काळानुरूप काही कालखंड मानल्याचे आपल्या लक्षात येते. यामध्ये असलेल्या साठोत्तरी मराठी साहित्यामध्ये ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, जनवादी इत्यादी वाङ्.मयीन प्रवाह निर्माण झाले. या सर्व वाङ्.मयीन प्रवाहामध्ये महत्त्वाचा वाङ्.मयीन प्रवाह म्हणजे ग्रामीण साहित्याचा प्रवाह होय. महात्मा जोतिबा फुले यांची मुख्य प्रेरणा असलेल्या या साहित्य प्रवाहात प्रामुख्याने ग्रामीण लोकांच्या सुखदु:खाचा, व्यथा–वेदनांचा, श्रद्धा–अंधश्रद्धांचा, रुढी–परंपरांचा चर्चेचा विषय येतो. या साहित्यामधून ग्रामीण जीवनाचं वास्तवचित्रण अतिशय बोलक्या व जिवंत पद्धतीने मांडल्याचे दिसून येते. हे साहित्य वाचत असताना आपणास ग्रामीण जीवन डोळ्यांसमोर उभे राहिल्याचे जाणवते. ग्रामीण जीवनातील सुखदु:ख हा प्रस्तुत प्रबंधलेखकाचा जिव्हाळ्याचा विषय असल्याने व ग्रामीण जीवनाशी अतूट अशी नाळ असल्याने संशोधनासाठी हे सर्व ग्रामीण वातावरण चित्रित झालेल्या 'गावठाण' या कादंबरीची निवड करून या कादंबरीचा सर्वांगीण अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत प्रबंधामध्ये 'ग्रामीण साहित्य स्वरूप व वाटचाल' या पहिल्या प्रकरणामध्ये एकूणच ग्रामीण साहित्याच्या स्वरूपाचा व वाटचालीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेल्या वाङ्,मयीन चळवळीमध्ये ग्रामीण साहित्याची चळवळ ही एक महत्त्वाची चळवळ असल्याचे दिसून येते. संपूर्णच साहित्याची लक्षणे सांगताना पौर्वात्य व पाश्चात्य साहित्यशास्त्रज्ञांनी आपआपली नेमकी मते व्यक्त केल्याचे दिसून येते. एकूणच साहित्यावर जीवनाचा पर्यायाने समाजजीवनाचा परिणाम होताना दिसून येतो व त्या जीवनानुभवातूनच साहित्याची निर्मिती होत असते. जीवनातील वास्तव प्रश्नातून साहित्यिक चळवळी जन्म घेत असतात. उदा. ग्रामीण, दलित साहित्याच्या चळवळी ह्या जीवनातील प्रश्नातूनच निर्माण झाल्याचे दिसून येते. ग्रामीण साहित्याच्या चळवळीचे मुळ हे ग्रामीण

जीवनाचे दु:ख, व्यथा, वेदना, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा हेच असल्याचे दिसून येते. 'शेतकऱ्याचा आसूड', 'ब्राह्मणांचे कसब', गुलामगिरी, 'तृतीयरत्न', 'सार्वजनिक सत्यधर्म', 'सत्सार' इ. ग्रंथ लिहून शेतकऱ्यांना विज्ञाननिष्ठ दृष्टी देणारे महात्मा फुले हे ग्रामीण साहित्याचे प्रेरणास्थान ठरतात. ग्रामीण जीवनातून फुलणारे व ग्रामीण वास्तवातून साकार होणारे हेच ग्रामीण साहित्याचे स्वरूप आहे. ग्रामीण जीवनाचा कृषिकेंद्रीतता व निसर्गाधिनता हाच आत्मा असल्याचे दिसून येते. आधुनिकीकरणाचा व औद्योगिकिकरणाचा कितीही परिणाम झाला तरी ग्रामीण आणि नगर हा भेद राहणार आहे. महात्मा फुल्यांबरोबरच राजर्षी शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचार सरणीतून ग्रामीण साहित्य जन्म घेताना दिसते.

महात्मा गांधींनी १९२० च्या दरम्यान दिलेली खेड्याकडे चला ही हाक ग्रामीण साहित्यावर व एकूणच ग्रामीण जीवनावर परिणाम करून गेली. ग्रामीण साहित्यिकांमध्ये आनंद यादव, श्री.म.माटे, रा.रं.बोराडे, व्यंकटेश माडगूळकर, ना.धों.महानोर, उद्धव शेळके, हमीद लवाई, सदानंद देशमुख, इंद्रजित भालेराव, शंकर पाटील इ. प्रतिभासंपन्न साहित्यिक असल्याचे दिसून येते. ग्रामीण साहित्य हे कथा, कविता, कादंबरी या साहित्य प्रकारांमधून फुलताना दिसून येते. अशा या ग्रामीण साहित्यावर काही आरोप होताना दिसून येतात. त्याचबरोबर त्याच्या काही मर्यादाही स्पष्ट होतात. ग्रामीण जीवनात होणाऱ्या बदलांमुळे आज ग्रामीण समाजासमोर नवी आव्हाने नवे प्रश्न उभे राहिले आहेत आणि यावरच ग्रामीण साहित्याचे उद्याचे भवितव्य अवलंबून असल्याचे दिसते. या सर्व गोष्टींची सदर प्रकरणात चोहोबाजूंनी मीमांसा करण्याचा प्रयत्न केला आहे.

'मराठी ग्रामीण कादंबरी व गावठाण' ह्या दुसऱ्या प्रकरणाची मीमांसा करताना मराठी ग्रामीण वाड्.मय कथा कवितेप्रमाणे कादंबरीमध्येही यशस्वी झाल्याचे आपणास दिसून येते. वाड्.मयीन क्षेत्रामध्ये एका विशिष्ट स्वरूपाच्या वाड्.मय प्रकाराचा निर्देश करण्यासाठी कादंबरी ही संज्ञा मराठीत रूढ झाली आहे. मराठी ग्रामीण कादंबरीचा कृषिकेंद्रितता व

तिच्या भोवती फिरणारा गावगाडा हाच केंद्रबिंदू आहे. 'पिराजी पाटील' ही धर्नुधारी यांची कादंबरी खऱ्या अर्थाने पहिली ग्रामीण कादंबरी ठरते. संपूर्ण ग्रामीण कादंबरीच्या प्रवाहाला शंभर वर्षाची दीर्घ परंपरा असल्याचे दिसून येते. ग्रामीण आणि प्रादेशिक ह्या संकल्पना कादंबरीच्या बाबतीतही चर्चीलेल्या आपणास दिसून येतात. एकूणच मराठी साहित्यामध्ये प्रादेशिक व ग्रामीण कादंबऱ्या आपआपल्या वैशिष्ट्यांसह अवतिर्ण होताना दिसून येतात. मराठी गामीण कादंबरी ही ग्रामीणतेतून साकारताना आपल्याला दिसून येते. अशा या ग्रामीण कादंबरीला एक विशिष्ट प्रकारचा रूपबंध लाभल्याचे दिसून येते. एकूणच ग्रामीण कादंबरीमध्ये भौगोलिकता, सामुदायिकता, भाषाशैली, कृषिजीवन, संस्कृती, रूढी, परंपरा, ग्रामजीवन, कुटूंबव्यवस्था ही ग्रामीण कादंबरीची ठळक वैशिष्ट्ये दिसून येतात. अशा या ग्रामीण कादंबरी विकासाचे स्थूलमानाने अनेक टप्पे केल्याचे दिसून येते. या टप्प्यांमध्ये ग्रामीण कादंबरीला अनेक प्रतिभासंपन्न कादंबरीकारांनी उत्तरोत्तर अधिक वास्तवस्पर्शी व जिवंत केल्याचे जाणवते. या प्रतिभासंपन्न कादंबरीकारांमध्ये आनंद यादवांची 'गोतावळा', व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी', रा.रं.बोराडेंची 'पाचोळा', उद्धव शेळकेंची 'धग', हमीद दलवाईची 'इंधन', शंकर पाटीलांची 'टारफुला' इ. महत्त्वाच्या साहित्यकृती आपणास दिसून येतात. एकूणच ग्रामीण कादंबरीला समांतर जाणाऱ्या अस्सल ग्रामीणत्वाचा आविष्कार करणाऱ्या व ग्रामीण स्त्रीच्या जीवनाची शोकांतिका प्रातिनिधिक स्वरूपात मांडणाऱ्या 'गावठाण' या कादंबरीचा सर्वांगीण परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

'गावठाण' मधील अनुभवांची सामाजिकता' या तिसऱ्या प्रकरणामध्ये गावठाण मधून येणाऱ्या सामाजिकतेचा समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीच्या अनुषंगाने अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. तो करत असताना गावठाणमधून ग्रामीण समाज जीवनाचा सर्वांगीण आविष्कार होताना दिसून येतो. ग्रामीण भागातील अस्सल दारिद्र्याचा पदर प्रत्ययास येताना दिसतो. शेतकरी जीवनाचा खराखुरा पट अतिशय जिवंतपणे गावठाण मधून उभा राहताना दिसून येतो. तसेच ग्रामीण भागातील सावकारीचा पाश, ग्रामीण समाजातील श्रद्धा–अंधश्रद्धा आपल्याला गावठाण वाचत असताना प्रकर्षाने जाणवतात. त्याचबरोबर श्रद्धायुक्त भोळ्या

समजूतींचा प्रत्यय येतो व ग्रामीण माणसांची गावच्या पांढरीवर, वाघुजाईवर, तांबुजाईवर, विठ्ठलाईवर असणारी श्रद्धा दिसून येते. निसर्गाच्या लहरीपणाचा फटका शेतकऱ्याला कशाप्रकारे बसतो याचे प्रत्ययकारी दर्शन गावठाणमध्ये होते. ग्रामीण समाजाचा अविभाज्य भाग असलेल्या रूढी, प्रथा, परंपरा यांचे उत्कट दर्शन आपल्याला गावठाण मध्ये घडते. औद्योगिकरणामुळे झालेले खेड्यांचे संक्रमण आपल्याला 'गावठाण' मध्येही दिसून येते. त्याचबरोबर माणसातील कमालीच्या प्रेमाचा प्रत्यय एकीकडे, तर दुसरीकडे प्रचंड कौटुंबिक संघर्ष असल्याचे जाणवते. रक्ताच्या नात्यातील तुटलेपणाबरोबरच सामूहिक भावनेचे प्रत्ययकारी चित्रण आपल्याला गावठाण मधून होताना दिसते. शेतकऱ्याच्या शेतमालाची परवड व ग्रामीण भागातून दिसणारे पशुपक्षी, प्राणी व माती बद्दलचे प्रेम गावठाण मधून अवतिर्ण होताना दिसते. या सर्व गोष्टींची सखोल अशी मीमांसा करून योग्य तिथे संदर्भाची नोंद देऊन सदर प्रकरणाचा सर्वांगाने उहापोह करण्याचा प्रयत्न केला आहे.

गावठाण मधील अनुभवांची सामाजिकता पाहिल्यानंतर 'गावठाण' कादंबरीचे वाङ्.मयीन मूल्यमापन या चौथ्या प्रकरणाचा अभ्यास करताना कादंबरीच्या यशस्वीतेसाठी कादंबरीतून आविष्कृत होणाऱ्या वाङ्.मयीन वैशिष्ट्यांची चर्चा केली. ती करत असताना गावठाण कादंबरीचे निवेदन हे प्रथमपुरुषी एकवचनी अशा स्वरूपाचे असल्याचे दिसून येते. कादंबरीमध्ये पन्हाळ्याच्या परिसरातील बोली भाषेचा वापर करून संपूर्ण कादंबरीही बोलीभाषेतून साकारली आहे. कादंबरीची भाषा ही मनाचा वेध घेणारी व प्रवाही स्वरूपाची असल्याचे दिसून येते. 'गावठाण' मधून काव्यात्मकतेबरोबरच उत्कट अशा संवादाचा प्रत्यय येतो. कादंबरीतून साकारलेली व्यक्तिचित्रणे ही वास्तवस्पर्शी व वस्तूनिष्ठ अशा पद्धतीने साकारल्याचे दिसून येते. 'गावठाण'मध्ये प्रतिमा, प्रतिकांच्या बरोबरच समर्पक अशा म्हणी व वाक्प्रचाराचा चपखलपणे वापर केल्याचे जाणवते. अस्सल असा ग्रामीणत्त्वाचा आविष्कार करणाऱ्या ग्रामीण शिव्याही कथानकाच्या आवश्यकतेतून आलेला दिसून येतात व त्यामुळे कादंबरीचे वाङ्.मयीन मूल्य वाढल्याचे दिसते. यामुळे एकूणच मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये कृष्णात खोतांच्या लेखनाच्या वेगळेपणाचा आपणास प्रत्यय

येतो. अशाप्रकारे सदर प्रकरणाचा वाङ्.मीन दृष्टीने चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

एकूणच 'मराठी ग्रामीण कादंबरी : 'गावठाण' एक अभ्यास' ह्या प्रबंधिकेचा अभ्यास करताना अनेक साहित्यिकांच्या, भाषा शास्त्रज्ञांच्या, साहित्य मीमांसकांच्या मतांचा आधार घेऊन सदर प्रबंधिकेचा अभ्यास सखोल व चिकित्सक पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला आहे.